महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.

दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


==========================================================================

जावक क्रमांक – ३४१/१०   दिनांक :- २९ जानेवारी, २०२५

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडाच्या माध्यमातून दोन वर्षात सुमारे एक लाख घरे उभारणार-

उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे

## म्हाडा पुणे मंडळातर्फे ३६६२ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत उत्साहात

मुंबई, दि. २९ जानेवारी, २०२५ :- सर्वसामान्य नागरिकांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र शासन कटीबद्ध असून येत्या दोन वर्षात म्हाडाच्या माध्यमातून राज्यात सुमारे एक लाख घरांच्या उभारणीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहे. सदर उद्दिष्टपूर्तीसाठी राज्याचे गृहनिर्माण धोरण देखील लवकरच जाहीर करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी आज केले.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीएसह सोलापूर जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील ३,६६२ सदनिकांच्या विक्रीकरिता संगणकीय सोडत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री तथा पुणे पालकमंत्री श्री. अजित पवार, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, म्हाडा पुणे मंडळाचे सभापती श्री. शिवाजीराव आढळराव पाटील, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातून दूरदृश्य प्रणालीद्वारे काढण्यात आली. यावेळी श्री. शिंदे बोलत होते.

या प्रसंगी उपमुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले की, देशाच्या अर्थव्यवस्थेला उभारी देण्याकरिता केंद्र सरकार देशभरात चार राज्यांमध्ये ग्रोथ हब उभारणार आहे. यापैकी एक मुंबई महानगर क्षेत्रात आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग, आयटी कंपन्या, सेवा क्षेत्रांचा समावेश असणार आहे. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात अधिकारी कर्मचारी वर्ग निर्माण होणार आहे. या पार्श्वभूमीवर म्हाडा तब्बल आठ लाख घरे उभारणार आहे. तसेच योजनाबद्ध गृहनिर्मिती अंतर्गत भाडेतत्वावरील घरे आणि नोकरी करणाऱ्या महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ठिकठिकाणी वसतिगृह देखील उभारले जाणार आहेत, अशी माहिती श्री शिंदे यांनी दिली. तसेच ते पुढे म्हणाले की मुंबई शहराच्या भौगोलिक सीमा लक्षात घेता समूह पुनर्विकासद्वारे ईको-फ्रेंडली गृहनिर्मितीवर देखील भर दिला जाणार आहे. तसेच ते म्हणाले की, राज्यातील नागरिकांच्या हक्काच्या घराचे स्वप्न म्हाडाच्या माध्यमातून पूर्ण होत आहे याचा आनंद आहे. म्हाडा पुणे मंडळाच्या ३६६२ सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित सोडतीमध्ये अनामत रकमेसह ७१,६४२ अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्जदारांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या

(म्हाडाच्या) पारदर्शक कार्यप्रणालीवर दाखवलेला हा विश्वास आहे. अर्जदारांचा हाच विश्वास सार्थ ठरवण्यासाठी घरांची गुणवत्ता व सोडतीच्या पारदर्शकतेमध्ये कुठेही तडजोड न करता सोडतीतील विजेत्या अर्जदारांना तात्काळ सदनिकांचा ताबा देण्यात यावा, असे संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी निर्देशित केले. महाराष्ट्र शासन विविध योजनांच्या माध्यमातून परवडणाऱ्या घरांची निर्मिती करीत आहे. 'म्हाडा'ने गेल्या दीड वर्षात १३ सोडतींच्या माध्यमातून सुमारे ३० हजार घरे उपलब्ध करून दिली आहेत, ही कौतुकास्पद बाब असल्याचे ते म्हणाले. रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प मार्गी लागावेत व झोपडपट्टी पुनर्विकास व्हावा यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात गृहसाठा उपलब्ध होणार आहे. मुंबई पुणे, ठाणे या शहरांमध्ये समूह पुनर्विकास योजनेद्वारे योजनाबद्ध गृहनिर्मिती करण्यासाठी शासनातर्फे प्रयत्न केले जात असल्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले. पुणे येथे देखील समूह पुनर्विकास योजना राबवण्याचे सुतोवाच श्री. शिंदे यांनी केले.

याप्रसंगी राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार म्हणाले की, पुणे मंडळाच्या आजच्या सोडतीला लाभलेला उत्तुंग प्रतिसाद म्हणजे राज्यात परवडणाऱ्या दरातील घरांची गरज अधोरेखित होते. तसेच म्हाडाच्या पारदर्शक सोडत प्रणालीवर नागरिकांचा विश्वास देखील दर्शवितो. म्हाडाचा लाभार्थी हा म्हाडासाठी मोठी गुंतवणूक असून सदर लाभार्थी हेच म्हाडाचे ब्रँड अँबेसिडर आहेत. म्हाडातर्फे उभारण्यात येणारे परवडणाऱ्या दरातील घरे त्यांना संगणकीय सोडत प्रणालीद्वारे पारदर्शक रित्या वितरित केली जातात. याकामी म्हाडातर्फे मानवी हस्तक्षेपविरहित संपूर्णतः ऑनलाइन अशा IHLMS २.० (Integrated Housing Lottery Management System) या संगणकीय प्रणालीद्वारे ही सोडत प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या नूतन प्रणालीनुसार अर्ज नोंदणीकरण व पात्रता निश्चिती झाल्यानंतरच अर्जदार सोडत प्रक्रियेत सहभागी होतो. सोडतीत विजेता ठरल्यानंतर, अर्जदारास सूचना पत्र पाठविले जाते व त्यातील तरतुदींची पूर्तता केल्यानंतर विजेत्या अर्जदारांना तात्पुरते देकार पत्र पाठविले जाते. ही सर्व प्रक्रिया अत्यंत सोपी व सुलभ पारदर्शक असून त्यासाठी कुठलाही मध्यस्थ/दलाल म्हाडाने नेमलेला नाही. करिता सोडत प्रक्रियेशिवाय अन्य मार्गानी म्हाडाचे घर घेण्याचा प्रयत्न करून नागरिकांनी आपली फसवणूक होण्यापासून टाळावे , असे आवाहन श्री. पवार यांनी केले.

संगणकीय सोडत कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सभापती श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केले. याप्रसंगी बोलतांना त्यांनी पुणे मंडळाच्या माध्यमातून आजवर मोठ्या प्रमाणात परवडणारी घरे उपलब्ध करून दिले आहेत व भविष्यात याकामी सदैव प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन देखील त्यांनी दिले. तसेच ते पुढे म्हणाले की, पुणे मंडळाच्या अखत्यारीतल प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजने अंतर्गत ताथवडे, म्हाळुंगे, सासवड, पुरंदर येथील सदनिका विक्री सुरू असून अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले.

म्हाडाच्या @mhadaofficial या अधिकृत यूट्यूब व फेसबूक समाजमाध्यम व्यासपीठांवरुन सोडतीचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. यामध्ये विविध ठिकाणांहून सुमारे ४८,००० नागरिकांनी सहभाग घेतला.

सोडतीमधील विजेत्या अर्जदारांची यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या वेबसाईटवर सायंकाळी ६.०० वाजता प्रसिद्ध केली जाणार असून विजेत्या अर्जदारांना एसएमएसद्वारेही विजेता ठरल्याबाबतची माहिती तात्काळ कळविली जाणार आहे.

यावेळी म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयस्वाल, ठाणे जिल्हाधिकारी श्री. अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका आयुक्त श्री. सौरभ राव, म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वानखडे, म्हाडा पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. राहुल साकोरे, उपमुख्य अभियंता श्री. सुनील ननावरे, श्री. अनिल अंकलगी, मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी श्रीमती सविता बोडके, उपमुख्य अधिकारी श्री. अतुल खोडे, उपअभियंता श्रीमती मनीषा मोरे आदी उपस्थित होते.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

===========================================================================

Outward No. : 341/10 Dt. January 29, 2025

Press Release

## MHADA to build one lakh homes in two years as part of Maharashtra's affordable housing initiative, says Deputy CM and Housing Minister Shri Eknath Shinde

Pune Board's computerized Lottery for 3,662 homes receives an overwhelming response

Mumbai, January 29, 2025: Mumbai, January 29, 2025: The Government of Maharashtra is committed to expanding affordable housing and ensuring that citizens have access to quality homes. As part of this vision, one lakh homes will be built across the state through MHADA in the next two years under a structured and planned approach. A new state housing policy will soon be introduced, stated Shri Eknath Shinde, Deputy Chief Minister and Housing Minister, Government of Maharashtra.

A computerized lottery for 3,662 homes under various housing schemes in Pune, Pimpri-Chinchwad, PMRDA, and Solapur was conducted under the leadership of Shri Eknath Shinde, Deputy Chief Minister and Housing Minister, Government of Maharashtra. The event was held via video conferencing from the Thane District Collector's Office in the presence of Shri Ajit Pawar, Deputy Chief Minister and Guardian Minister, Pune, Government of Maharashtra; Dr. Pankaj Bhoyar, Minister of State for Housing, Government of Maharashtra; Shri Shivajirao Adhalrao Patil, Chairman, MHADA Pune Board; and Mr. Sanjeev Jaiswal, Vice President and Chief Executive Officer, MHADA.

Speaking at the event, Shri Shinde highlighted that the Central Government has identified four states across the country for setting up growth hubs, one of which will be in the Mumbai Metropolitan Region. These hubs will house a large number of industries, IT companies, and service sector enterprises, creating significant employment opportunities. Considering this, MHADA plans to develop eight lakh homes to meet the housing demand. In addition, rental

housing and hostels for working women, students, and senior citizens will be developed under a structured housing approach. Shri Shinde also emphasized that given Mumbai's geographical constraints, redevelopment will focus on eco-friendly housing through cluster development.

Shri Shinde expressed satisfaction that MHADA is fulfilling the dream of homeownership for many citizens. He noted that the Pune Board's housing lottery received 71,642 applications for 3,662 homes, demonstrating strong public confidence in MHADA's transparent process. To uphold this trust, he directed officials to ensure that the successful applicants receive possession of their homes without any delay, maintaining complete transparency and adherence to quality standards. Maharashtra Government is continuously working on various schemes to provide affordable housing, and in the past 18 months, MHADA has successfully allotted 30,000 homes through 13 lotteries. Additionally, efforts are being made to resolve stalled housing projects and accelerate slum redevelopment to enhance housing availability. Cluster redevelopment projects are being prioritized in Mumbai, Pune, and Thane, with similar initiatives under consideration for Pune.

Shri Ajit Pawar, Deputy Chief Minister and Guardian Minister, Pune, Government of Maharashtra, emphasized that the strong response to this housing lottery highlights the need for more affordable housing in the state and reinforces public trust in MHADA's transparent lottery system. He noted that MHADA's beneficiaries are its true representatives, and their participation strengthens the credibility of its initiatives. The homes developed by MHADA are allocated transparently through a fully digital system, ensuring fairness. The Integrated Housing Lottery Management System (IHLMS 2.0) is an automated, interference-free process where applicants must complete registration and eligibility verification before participating. Once selected, winners receive a formal intimation letter followed by a provisional allotment letter upon completing necessary formalities. Shri Pawar urged citizens not to fall prey to intermediaries, as MHADA does not authorize any agents or brokers for home allocation.

The event began with an introduction by Shri Shivajirao Adhalrao Patil, Chairman, MHADA Pune Board, who highlighted that the Pune Board has successfully provided affordable homes in the past and remains committed to future housing initiatives. He also announced that under the first-come, first-served scheme, homes in Tathawade, Mahalunge, Saswad, and Purandare are currently available, encouraging citizens to take advantage of this opportunity.

The event was broadcast live on MHADA's official social media platforms, including @mhadaofficial on YouTube and Facebook, where over 48,000 people tuned in. The list of successful applicants will be published on housing.mhada.gov.in at 6:00 PM, and winners will also be notified via SMS.

The event was also attended by Mr. Ashok Shingare, District Collector, Thane, Government of Maharashtra; Mr. Saurabh Rao, Commissioner, Thane Municipal Corporation; Mr. Anil Wankhede, Deputy Chief Executive Officer, MHADA; Mr. Rahul Sakore, Chief Officer, MHADA Pune Board; Mr. Sunil Nanavare, Deputy Chief Engineer, MHADA Pune Board; Mr. Anil Ankalgi, Deputy Chief Engineer, MHADA Pune Board; Mrs. Savita Bodke, Chief Information and Communication Technology Officer, MHADA; Mr. Atul Khode, Deputy Chief Officer, MHADA Pune Board; and Mrs. Manisha More, Deputy Engineer, MHADA Pune Board.

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==============================================================================

Outward No. : 341/10 Dt. January 29, 2025

## प्रेस विज्ञप्ति

**म्हाडा के माध्यम से दो साल में एक लाख घर तैयार करने की योजना** – उपमुख्यमंत्री और गृहनिर्माण मंत्री श्री एकनाथ शिंदे

म्हाडा पुणे मंडल की ३६६२ घरों की लॉटरी सफलतापूर्वक पूरी

मुंबई, २९ जनवरी २०२५: महाराष्ट्र सरकार आम नागरिकों को किफायती और अच्छे घर उपलब्ध कराने के लिए पूरी कोशिश कर रही है। इसी उद्देश्य से अगले दो साल में म्हाडा के माध्यम से एक लाख घर तैयार करने की योजना पर काम किया जा रहा है। इस लक्ष्य को पूरा करने के लिए जल्द ही नई गृहनिर्माण नीति लागू की जाएगी, ऐसा उपमुख्यमंत्री और गृहनिर्माण मंत्री श्री एकनाथ शिंदे ने कहा।

पुणे, पिंपरी-चिंचवड़, पीएमआरडीए और सोलापुर में ३६६२ घरों की बिक्री के लिए संगणकीय लॉटरी आयोजित की गई। यह कार्यक्रम श्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री और गृहनिर्माण मंत्री, महाराष्ट्र सरकार के नेतृत्व में संपन्न हुआ। यह लॉटरी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय से वीडियो कॉन्फ्रेंसिंग के माध्यम से निकाली गई। इस अवसर पर श्री अजित पवार, उपमुख्यमंत्री और पुणे के पालकमंत्री, महाराष्ट्र सरकार; डॉ. पंकज भोयर, राज्य गृहनिर्माण मंत्री, महाराष्ट्र सरकार; श्री शिवाजीराव आढलराव पाटील, अध्यक्ष, म्हाडा पुणे मंडल; और श्री संजीव जयस्वाल, उपाध्यक्ष और मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा उपस्थित थे।

इस अवसर पर श्री शिंदे ने कहा कि देश की अर्थव्यवस्था को मजबूत करने के लिए केंद्र सरकार ने चार राज्यों में ग्रोथ हब विकसित करने की योजना बनाई है, जिनमें से एक मुंबई महानगर क्षेत्र में होगा। इसमें आईटी कंपनियां, उद्योग और सेवा क्षेत्र से जुड़े विभिन्न संस्थान होंगे, जिससे बड़ी संख्या में नौकरियों का निर्माण होगा। इस पृष्ठभूमि में म्हाडा आठ लाख घर विकसित करने की योजना पर कार्य कर रहा है। इसके अलावा, किफायती किराए के मकान और कामकाजी महिलाओं, विद्यार्थियों और वरिष्ठ नागरिकों के लिए छात्रावास भी बनाए जाएंगे। श्री शिंदे ने यह भी कहा कि मुंबई में सीमित स्थान को ध्यान में रखते हुए पर्यावरण-अनुकूल (इको-फ्रेंडली) घरों के निर्माण को प्राथमिकता दी जाएगी।

श्री शिंदे ने यह भी कहा कि म्हाडा के माध्यम से राज्य के नागरिकों का अपने घर का सपना साकार हो रहा है, जो सरकार के लिए गर्व की बात है। उन्होंने बताया कि पुणे मंडल की इस लॉटरी के लिए ७१,६४२ आवेदन प्राप्त हुए, जिससे साफ है कि लोग म्हाडा की पारदर्शी प्रक्रिया पर भरोसा करते हैं। उन्होंने

अधिकारियों को निर्देश दिया कि लॉटरी के विजेताओं को जल्द से जल्द घर दिए जाएं और पूरी प्रक्रिया पारदर्शी और निष्पक्ष तरीके से पूरी हो। महाराष्ट्र सरकार किफायती घरों की संख्या बढ़ाने के लिए लगातार काम कर रही है और पिछले १८ महीनों में म्हाडा ने १३ लॉटरी के माध्यम से ३०,००० से अधिक घर उपलब्ध कराए हैं। इसके अलावा, अधूरी पड़ी योजनाओं को पूरा करने और पुनर्विकास को गति देने के लिए भी सरकार लगातार काम कर रही है। मुंबई, पुणे और ठाणे में पुनर्विकास परियोजनाओं को प्राथमिकता दी जा रही है, और पुणे में भी इसी तरह की योजनाओं पर विचार किया जा रहा है।

श्री अजित पवार, उपमुख्यमंत्री और पुणे के पालकमंत्री, महाराष्ट्र सरकार, ने कहा कि पुणे मंडल की इस लॉटरी को मिला जबरदस्त प्रतिसाद यह दर्शाता है कि राज्य में किफायती घरों की बड़ी आवश्यकता है। यह म्हाडा की पारदर्शी लॉटरी प्रणाली में नागरिकों के विश्वास को भी मजबूत करता है। उन्होंने कहा कि म्हाडा के लाभार्थी ही इसकी सबसे बड़ी ताकत हैं, और उनकी भागीदारी से संस्था को और मजबूती मिलती है। म्हाडा द्वारा विकसित किए जा रहे किफायती घर पारदर्शी तरीके से संगणकीय लॉटरी प्रणाली के माध्यम से आवंटित किए जाते हैं। यह लॉटरी मानवी हस्तक्षेप रहित IHLMS २.० प्रणाली (Integrated Housing Lottery Management System) द्वारा पूरी तरह डिजिटल पद्धति से आयोजित की गई। आवेदन प्रक्रिया के दौरान पात्रता की जांच के बाद ही आवेदकों को लॉटरी में शामिल किया गया। विजेताओं को सबसे पहले सूचना पत्र भेजा जाएगा, और सभी आवश्यक औपचारिकताएं पूरी करने के बाद उन्हें घर का अस्थायी स्वीकृति पत्र मिलेगा। श्री पवार ने नागरिकों से किसी भी बिचौलिए के झांसे में न आने की अपील की, क्योंकि म्हाडा की ओर से किसी भी एजेंट को अधिकृत नहीं किया गया है।

कार्यक्रम की शुरुआत में श्री शिवाजीराव आढलराव पाटील, अध्यक्ष, म्हाडा पुणे मंडल, ने कहा कि पुणे मंडल अब तक बड़ी संख्या में किफायती घर उपलब्ध करा चुका है और भविष्य में भी यह प्रयास जारी रहेगा। उन्होंने यह भी घोषणा की कि पहले आओ, पहले पाओ योजना के तहत ताथवडे, महालुंगे, सासवड और पुरंदरे में घरों की बिक्री जारी है, और अधिक से अधिक नागरिकों को इसका लाभ उठाना चाहिए।\

म्हाडा का यह कार्यक्रम @mhadaofficial यूट्यूब और फेसबुक पेज पर लाइव प्रसारित किया गया, जिसे ४८,००० से अधिक लोगों ने देखा। लॉटरी के विजेताओं की सूची शाम ६:०० बजे housing.mhada.gov.in पर प्रकाशित की जाएगी, और सभी विजेताओं को एसएमएस के माध्यम से भी जानकारी दी जाएगी।

इस कार्यक्रम में श्री अशोक शिनगारे, जिलाधिकारी, ठाणे, महाराष्ट्र सरकार; श्री सौरभ राव, आयुक्त, ठाणे महानगरपालिका; श्री अनिल वानखडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा; श्री राहुल साकोरे, मुख्य अधिकारी, म्हाडा पुणे मंडल; श्री सुनील ननावरे, उपमुख्य अभियंता, म्हाडा पुणे मंडल; श्री अनिल अंकलगी, उपमुख्य अभियंता, म्हाडा पुणे मंडल; श्रीमती सविता बोडके, मुख्य सूचना अधिकारी, म्हाडा; श्री

अतुल खोडे, उपमुख्य अधिकारी, म्हाडा पुणे मंडल; और श्रीमती मनीषा मोरे, उपअभियंता, म्हाडा पुणे मंडल सहित कई वरिष्ठ अधिकारी उपस्थित थे।

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा


म्हाडा
पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे
३६६२ सदनिकांची ऑनलाईन
सोडत

